# ‘पुस्तकासारखा दुसरा मित्र नाही’

पणजी, दि.२० (पत्रक) :

पुस्तका सारखा दुसरा चांगला मित्र नाही. गुरु नाही, वेळप्रसंगी मैत्री तुटू शकते, गुरु विद्या लपवू शकतो मात्र, पुस्तक नाही. प्राचीन, आधुनिक अशा विचाराचे संचित जाणून घेण्यासाठी पुस्तक हे महत्त्वाचे माध्यम आहे, असे प्रतिपादन उपसभापती विष्णू सुर्या वाघ यांनी केले.

‘गोवा लायब्ररी असोसिएशन’ या नवीन संघटनेच्या उद्‌घाटन प्रसंगी उपसभापती वाघ बोलत होते. ते म्हणाले की, आपण किती वाचतो यापेक्षा काय वाचतो आणि कसे वाचतो, यावर आपली आकलन शक्ती वाढत जाते, स्मरणशक्ती वाढते. यामुळे विद्यार्थ्यांनी वाचनाची गरज आहे. पालकांनीही विद्यार्थ्यांना काय वाचावे, याचे मार्गदर्शन करण्याची गरज आहे. तसेच नामांकित संतांचे, प्रेरणादायी पुस्तके द्यावीत. यामुळे विद्यार्थ्यांना भविष्यात येणाऱ्या आडचणींचा सामना करता येईल. आजच्या तांत्रिक युगात वाचनालयांनी सुद्धा बऱ्यापैकी आपली सांगड आधुनिक तंत्रज्ञानाशी घातलेली आहे. यामुळे सध्याच्या विद्यार्थ्यांना याचा फायदा होईल. मात्र, विद्यार्थ्यांना वाचनालयांशी मैत्री करण्याची गरज आहे, असे ते म्हणाले. यावेळी उपसभापतींच्या हस्ते गोवा लायब्ररी असोसिएशनच्या मार्गदर्शकाचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी साळगावकर कॉलेजचे प्राचार्य प्रसाद सर यांनी मनोगत व्यक्त केले. तत्पूर्वी संस्थापक अध्यक्ष निर्मला परब यांनी प्रास्ताविक केले. खजिनदार – बाळा मांद्रेकर यांनी पाहुण्यांची ओळख करुन दिली. सूत्रसंचालन करुणा सातार्डेकर यांनी केले. सचिव मानसी केरीम यांनी आभार मानले.

गुरुवार, २१ जुलै २०१६
Dainik Herald, Thursday, July 21, 2016